RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ४० ] शुक्रवार, डिसेंबर २४, २०२१ / पौष ३, शके १९४३ [ पृष्ठे ३

**असाधारण क्रमांक ४०**

## प्राधिकृत प्रकाशन

**प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासन यांजकडून**

***शुद्धिपत्रक***

क्रमांक नपाप्र-१/काvि-१२२१/२०२१.--मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/नपं-२०२१/ प्र. क्र. ०३/का. ०६, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१ अन्वये नागरिकांचा मागास प्रवर्ग व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, नगरपंचायतीतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्केपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण नगरपरिषदेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही असे निर्देश दिलेले होते. त्याअनुषंगाने पुणे विभागातील जिल्हा सोलापूरमधील नवनिर्मित वैराग व नातेपुते नगरपंचायतींची सदस्यसंख्या निश्चित करणेत आली आहे. तसेच पुणे जिल्ह्यामधील देहू, सातारामधील पाटण, सोलापूरमधील माढा व महाळूंग-श्रीपूर या नगरपंचायतींच्या सदस्यसंख्येबाबत शुद्धिपत्रक दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ चे आदेशान्वये प्रसिद्ध करणेत आले असून ते दिनांक १३ नोव्हेंबर २०२१ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक ३१ मध्ये प्रसिद्ध केलेले आहे ;

तद्नंतर, ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ अन्वये नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २७ टक्क्यांच्या वर आरक्षण देता येणार नाही, म्हणजेच कमाल ४ जागा नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी देता येतील हे स्पष्ट केले आहे. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडील प्राप्त अहवालानुसार जिल्हा पुणेमधील माळेगाव (बुद्रुक), सातारा जिल्ह्यामधील लोणंद, कोरेगाव, वडूज, खंडाळा, दहीवडी, सांगलीमधील कडेगाव, खानापूर, कवठेमहांकाळ व सोलापूर जिल्ह्यामधील माळशिरस, वैराग, नातेपुते नगरपंचायतींसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग जागांसाठी आरक्षण देताना ५ जागा दिलेचे दिसून आलेने या नगरपंचायतींचे सदस्य संख्येबाबत शुद्धिपत्रक दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ चे आदेशान्वये प्रसिद्ध करणेत आले आहे. याबाबत दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक ३२ मध्ये प्रसिद्ध केलेली आहे ;

तद्नंतर ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र दिनांक १७ डिसेंबर २०२१ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १९७५६/२०२१ मध्ये दिनांक १५ डिसेंबर २०२१ रोजीच्या सुनावणीनंतर पारित केलेल्या आदेशामध्ये आयोगाला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या ज्या जागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे त्या जागा तात्काळ अनारक्षित करून सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्यात याव्यात. त्यास अनुसरून मा. राज्य निवडणूक आयोगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आदेश दिलेले आहेत.

सबब, पुणे विभागात सुरू असलेल्या उक्त नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांमधील नागरिकांचा मागास प्रवर्ग जागांच्या आरक्षणाबाबत दुरुस्त सदस्यसंख्या सोबतच्या शुद्धीपत्रकाद्वारे निश्चित करण्यात येत आहे.

**विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांचेकडून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करणेत आलेल्या (खालील तक्त्यामधील रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या) नगरपंचायतींचे मागास प्रवर्ग सदस्य संख्येचे** *शुद्धीपत्रक*

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | अ. क्र. | नगर-पंचायतीचे नाव | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग १-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये शुद्धिपत्रकाद्वारे प्रसिद्धीचा क्रमांक व दिनांक | निवडून द्यावयाची सदस्य संख्या | रकाना क्रमांक ५ नुसार राजपत्रात प्रसिद्ध केलेली सदस्य संख्या — राखून ठेवलेली सदस्य संख्या: स्त्रियांसाठी (५० टक्के) | अनु. जातीसाठी | अनु. जमातीसाठी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी | रकाना ७ पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची विभागणी: अनु. जातीसाठी रकाना ८ पैकी | अनु. जमातीसाठी रकाना ९ पैकी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी रकाना १० पैकी | सर्वसाधारण | शुद्धीपत्रकान्वये करावयाची सदस्य संख्या — राखून ठेवलेली सदस्य संख्या: स्त्रियांसाठी (५० टक्के) | अनु. जातीसाठी | अनु. जमातीसाठी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी | रकाना १४ पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची विभागणी: अनु. जातीसाठी रकाना १६ पैकी | अनु. जमातीसाठी रकाना १७ पैकी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी रकाना १८ पैकी | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| १ | पुणे | १ | देहू (नवनिर्मित) | क्रमांक नपाप्र-१/कावि-१०५७/२०२१, दिनांक १३-११-२०२१. | १७ | ९ | ३ | १ | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ३ | १ | ० | २ | ० | ० | ७ |
| २ | सातारा | २ | पाटण | | १७ | ९ | ३ | १ | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ३ | १ | ० | २ | ० | ० | ७ |
| | | ३ | लोणंद | क्रमांक नपाप्र- | १७ | ९ | २ | १ | ४ | १ | १ | २ | ५ | ९ | २ | १ | ० | १ | १ | ० | ७ |
| | | ४ | कोरेगाव | १/कावि-१०५८/ | १७ | ९ | २ | ० | ४ | १ | ० | २ | ६ | ९ | २ | ० | ० | १ | ० | ० | ८ |
| | | ५ | वडूज | २०२१, दिनांक | १७ | ९ | २ | ० | ४ | १ | ० | २ | ६ | ९ | २ | ० | ० | १ | ० | ० | ८ |
| | | ६ | खंडाळा | १५-११-२०२१ | १७ | ९ | ३ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ३ | ० | ० | २ | ० | ० | ७ |
| | | ७ | दहीवडी | | १७ | ९ | २ | ० | ४ | १ | ० | २ | ६ | ९ | २ | ० | ० | १ | ० | ० | ८ |
| ३ | सांगली | ८ | कडेगाव | | १७ | ९ | २ | ० | ४ | १ | ० | २ | ६ | ९ | २ | ० | ० | १ | ० | ० | ८ |
| | | ९ | खानापूर | | १७ | ९ | २ | ० | ४ | १ | ० | २ | ६ | ९ | २ | ० | ० | १ | ० | ० | ८ |
| | | १० | कवठेमहांकाळ | | १७ | ९ | ३ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ३ | ० | ० | २ | ० | ० | ७ |
| ४ | सोलापूर | ११ | माळशिरस | | १७ | ९ | ३ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ३ | ० | ० | २ | ० | ० | ७ |
| | | १२ | वैराग (नवनिर्मित) | | १७ | ९ | २ | ० | ४ | १ | ० | २ | ६ | ९ | २ | ० | ० | १ | ० | ० | ८ |
| | | १३ | नातेपुते (नवनिर्मित) | | १७ | ९ | ३ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ३ | ० | ० | २ | ० | ० | ७ |

**विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांचेकडून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करणेत आलेल्या (खालील तक्त्यामधील रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या) नगरपंचायतींचे मागास प्रवर्ग सदस्य संख्येचे** *शुद्धीपत्रक--* ***चालू***

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | अ. क्र. | नगर-पंचायतीचे नाव | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग १-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये शुद्धिपत्रकाद्वारे प्रसिद्धीचा क्रमांक व दिनांक | निवडून द्यावयाची सदस्य संख्या | रकाना क्रमांक ५ नुसार राजपत्रात प्रसिद्ध केलेली सदस्य संख्या — राखून ठेवलेली सदस्य संख्या: स्त्रियांसाठी (५० टक्के) | अनु. जातीसाठी | अनु. जमातीसाठी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी | रकाना ७ पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची विभागणी: अनु. जातीसाठी रकाना ८ पैकी | अनु. जमातीसाठी रकाना ९ पैकी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी रकाना १० पैकी | सर्वसाधारण | शुद्धीपत्रकान्वये करावयाची सदस्य संख्या — राखून ठेवलेली सदस्य संख्या: स्त्रियांसाठी (५० टक्के) | अनु. जातीसाठी | अनु. जमातीसाठी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी | रकाना १४ पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची विभागणी: अनु. जातीसाठी रकाना १६ पैकी | अनु. जमातीसाठी रकाना १७ पैकी | नागरिकांच्या मागासवर्गासाठी रकाना १८ पैकी | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | १४ | माढा | क्रमांक नपाप्र-१/कावि-१०५७/२०२१, दिनांक १३-११-२०२१. | १७ | ९ | ४ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ४ | ० | ० | २ | ० | ० | ७ |
| | | १५ | महाळूंग-श्रीपूर | | १७ | ९ | ४ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | ९ | ४ | ० | ० | २ | ० | ० | ७ |

**सौरभ राव,**
प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त,
नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे.

पुणे, २३ डिसेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.